तरुण भारत

21/9/14

# माळीण आपद्ग्रस्तांसाठी दोडामार्ग कॉलेजकडून मदत

प्रतिनिधी

दोडामार्ग

नवनिर्माण शिक्षण संस्था रत्नागिरी संचलित, लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने जमा केले. १५ हजार रुपयांचा निधी दोडामार्गचे तहसीलदार संतोष जाधव यांच्याकडे माळीण आपद्ग्रस्तांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी व प्राध्यापकांनी १४ सप्टेंबर रोजी दोडामार्ग बाजारपेठेत पुणे जिल्ह्यातील माळीण गावच्या आपद्ग्रस्तांसाठी मदतफेरीचे आयोजन केले होते. या फेरीत जमा झालेल्या १५ हजार २८ रुपये रकमेचा धनादेश १९ सप्टेंबर रोजी तहसीलदार संतोष जाधव यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्यासमवेत विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. एस. एन. जाधव, विद्यार्थी प्रतिनिधी अनिल गावडे, ममता गायचोर व भूषण सावंत उपस्थित होते.

**१५ हजारचे आर्थिक सहाय्य**